## थोडक्यात...

### पीएसआयच्या निष्काळजीपणामुळे युवतीचा मृत्यू; २७ लाख नुकसानभरपाईचे आदेश

(जावेद पटेल/दै.धर्मयोध्दा)

**छत्रपती संभाजीनगर -** शहरातील चर्चित आकेफा मेहरीन अपघात प्रकरणात मोटार अपघात न्यायाधिकरणाने महत्त्वपूर्ण निर्णय देत पीडित कुटुंबाला २७ लाख ५६० रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले आहेत. हा अपघात एका पोलीस अधिकाऱ्याच्या निष्काळजी वाहनचालकतेमुळे झाल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. संबंधित पोलीस उपनिरीक्षक, वाहनमालक आणि विमा कंपनी यांनी संयुक्तपणे ९ टक्के व्याजासह ही रक्कम अदा करावी, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. २२ एप्रिल २०१९ रोजी टाउन हॉल फ्लायओव्हरवर हा दुर्दैवी अपघात घडला होता. त्यावेळी गर्भवती असलेल्या आकेफा मेहरीन यांच्या मोपेडला एका भरधाव कारने मागून जोरदार धडक दिली. ही कार सिटी चौक पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक संतोष पाटे चालवत होते. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या आकेफा यांच्यावर उपचार सुरू असताना २४ एप्रिल २०१९ रोजी त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर न्याय मिळवण्यासाठी कुटुंबीयांनी न्यायालयात दावा दाखल केला होता. सुनावणीदरम्यान विमा कंपनीने मृत महिला वाहन चालवत होत्या व त्यांच्याकडे ड्रायव्हिंग लायसन्स नव्हते, असा दावा करून जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न केला. मात्र पीडित पक्षाच्या वकिलांनी सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निर्णयांचा दाखला देत हा युक्तिवाद फ टाळून लावला. सर्व बाजूंचा विचार करून न्यायाधिकरणाने अपघातासाठी जबाबदार पक्षांनाच नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले. या निर्णयानंतर आकेफा यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त करत, हा निर्णय आमच्या मुलीला परत आणू शकत नाही; मात्र निष्काळजीपणाविरुद्ध मजबूत संदेश देणारा आहे, अशी प्रतिक्रिया दिली. प्रकरणात पीडिताच्या वतीने ॲड. फय्याज पटेल व ॲड. सईद शेख यांनी यशस्वीरित्या खटला लढवत न्याय मिळवून दिला.



**परभणी - भगवान महावीर जन्मकल्याणक निमित्त शहरातील आनंदनगर येथील भगवान महावीर मंदिरापासून सोमवारी सकाळी शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेत महिला, पुरूष भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.**

# वन विभागाचा विरोधाभास उघड; विहिरीला जाळी, पण रोपवाटिका व पिंजरे दुर्लक्षित!

## सुरक्षेचे काम पूर्णत्वाकडे, मात्र हजारो रोपे पाण्याअभावी जळाली; बिबट्या पकडण्याचे पिंजरे धुळखात

(महेंद्र पुरी/ दै.धर्मयोध्दा)

**हिंगोली-** येथील वन विभाग कार्यालय परिसरात एकीकडे सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलत विहिरीवर लोखंडी जाळी बसवण्याचे काम प्रशासनाने हाती घेतले असले, तरी दुसरीकडे त्याच परिसरात रोपवाटिकेची झालेली दयनीय अवस्था आणि बिबट्या पकडण्यासाठी वापरले जाणारे पिंजरे निष्क्रिय अवस्थेत पडून असल्याचे वास्तव समोर आले आहे. यामुळे वन विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे

**विहिरीची सुरक्षा; अपघात टळण्याची शक्यता**





वन विभाग कार्यालय परिसरातील जुन्या विहिरीभोवती कोणतीही संरक्षणात्मक उपाययोजना नसल्यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला होता. याची दखल घेत प्रशासनाने अखेर विहिरीवर लोखंडी जाळी बसवण्याचे काम सुरू केले आहे. या उपक्रमामुळे भविष्यातील संभाव्य दुर्घटना टळण्यास मदत होणार असून, नागरिकांकडून या निर्णयाचे स्वागत केले जात आहे.

**रोपवाटिकेची दुर्दशा;**

हजारो रोपे जळून खाक मात्र, या सकारात्मक कामासोबतच वन विभागाच्या दुर्लक्षाचे विदारक चित्रही समोर आले आहे. कार्यालयाच्या मागील भागात पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने तयार करण्यात आलेली हजारो कोवळी रोपे पाण्याअभावी जळून गेल्याचे दिसून येत आहे. वेळेवर पाणीपुरवठा न झाल्याने ही रोपे वाळून गेली असून, यामुळे लाखो रुपयांचा खर्च वाया गेल्याची चर्चा आहे. ''ज्या विभागावर निसर्ग रक्षणाची जबाबदारी आहे, त्यांच्याच परिसरात अशी परिस्थिती का?'' असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

**बिबट्या पकडण्याचे पिंजरे धुळखात**

दरम्यान, हिंगोली जिल्हा व परिसरात बिबट्याच्या हालचाली वाढल्याच्या पार्श्वभूमीवर वन विभागाची तयारी कितपत आहे, यावरही प्रश्न निर्माण झाला आहे. विभागाच्या आवारात बिबट्या पकडण्यासाठी वापरले जाणारे लोखंडी पिंजरे उघड्यावर टाकून दिले असून, त्यावर धुळीचे थर साचले आहेत. अनेक दिवसांपासून त्यांचा वापर झालेला नसल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत अचानक बिबट्याचा उपद्रव वाढल्यास हे पिंजरे तत्काळ वापरण्यायोग्य राहतील का, याबाबत शंका व्यक्त केली जात आहे.

**नियोजनावर प्रश्नचिन्ह**

एकीकडे विहिरीच्या सुरक्षेसाठी उपाययोजना केल्या जात असताना दुसरीकडे रोपवाटिकेचे नुकसान आणि अत्यावश्यक साहित्याची दुरवस्था ही वन विभागाच्या ढिसाळ नियोजनाची साक्ष देत असल्याची चर्चा सुरू आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन आवश्यक ती दुरुस्ती व उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# ज्ञानसाधना नीट आणि जेईई फाउंडेशन येथील विद्यार्थ्यांना अभियांत्रिकीय प्रवेश प्रक्रिया व करिअर मार्गदर्शन

**परभणी -** ज्ञानसाधना प्रतिष्ठान, परभणी यांच्या वतीने ''ज्ञानसाधना नीट आणि जेईई फाउंडेशन'' अंतर्गत अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया व करिअर मार्गदर्शन या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधींबाबत योग्य दिशा देण्यासाठी व अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शनसाठी आयोजित करण्यात आला होता. प्रमुख व्याख्याते म्हणून मा. श्री. सुनील गोविंदपुरकर (लातूर) व मा. श्री. केतन ढोके (लातूर) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी व परीक्षांची तयारी, अभ्यास पद्धती, प्रवेश



प्रक्रियेतील गुंतागुंत, टप्पे, तांत्रिक अडचण तसेच करिअर निवडीतील महत्त्वाचे मुद्दे यावर सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री आर.एन. इतबारे सर यांनी केले कार्यक्रमाची सुरुवात ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेत हे पूजन करून करण्यात आली. ''यावेळेस पालक मंडळींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. चर्चासत्रात पालकांनी संस्थेबद्दल व संस्था अध्यक्ष, संस्था सचिव यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त केली की त्यांनी हा कार्यक्रम सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मुलांसाठी आयोजित केला.'' यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.प्रा. किरण सोनटक्के सर (अध्यक्ष ,ज्ञानसाधना प्रतिष्ठान परभणी) प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.सौ. शितल सोनटक्के (सचिव, ज्ञानसाधना प्रतिष्ठान परभणी) तसेच विभाग प्रमुख सौ. एस.डी धुळे, प्रा.आर.एन.इतबारे, शरद कणकापुरे, विशाल पोले आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिंदे के. डी. यांनी केले. तर प्रा. घुगे दीपक यांनी उपस्थित मान्यवरांचे व पालक मंडळींचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व समन्वय विभाग प्रमुख, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास विद्यार्थी, पालक उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना अभियांत्रिकीय प्रवेश प्रक्रिया व करिअरविषयक स्पष्ट दिशा मिळाल्याचे मत उपस्थित पालकांनी व्यक्त केले.

# रक्तबंबाळ अवस्थेत मृतदेह सापडला, चुडावा परिसरात खळबळ

**परभणी -** तालुक्यातील चुडावा पोलीस ठाणे हद्दीत एका शेतात रक्तबंबाळ अवस्थेत वृद्ध व्यक्तीचा मृतदेह सोमवारी(दि. ३०)सकाळी आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून मृताची ओळख पटविणे व मृत्यूमागील कारण शोधणे हे पोलीसांसमोर मोठे आव्हान ठरले आहे. प्राप्त माहितीनुसार, पूर्णा तालुक्यातील कावळगाव शिवारातील शेतकरी गंगाधर पिसाळ यांच्या शेतात सोमवारी सकाळच्या सुमारास अंदाजे ६० ते ६५ वर्षीय अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच चुडावा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविला. घटनास्थळी मृत व्यक्तीच्या कान व नाकातून रक्तस्त्राव झालेला दिसून आला. अंगात पांढऱ्या रंगाचा कुर्ता, पांढरे धोतर, पायात काळे बूट असा पोशाख असून दाढी - मिशा पांढऱ्या रंगाच्या असल्याचे पोलिसांनी सांगितले. मृताची ओळख अद्याप पटलेली नसून घटनेचा पुढील तपास चुडावा पोलीस करीत आहे.

# मंदिराचा निधी नाल्यांसाठी वळविल्याने भाविकां मध्ये संताप ; मंदीरात करणार आत्मक्लेश

(सिध्देश्वर गिरी/दै.धर्मयोध्दा)

**सोनपेठ-** जगदंबा देवी मंदीराच्या परीसरातील सभा मंडपासाठी राज्य शासनाने दिलेल्या एक कोटी रुपयांच्या निधीला राज्य शासनाने एका शुध्दीपत्रकांच्या आदेशानुसार रद्द करुन मानवत शहरातील नाल्यांच्या बांधकामासाठी वळविल्याने भाविकांनी तीव्र संताप व्यक्त करुन राज्य सरकारच्या या निर्णयाच्या विरोधात उद्या देवी मंदीरात आत्मक्लेश आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ईमेल व तहसीलदार यांच्या मार्फत देऊन या बाबत खेद व्यक्त केला. सोनपेठ नगर परिषदेच्या निवडणुकी पुर्वी अनेक मंदीरे व धार्मिक स्थळांना विविध कामांना मोठा निधी उपलब्ध करुन दिल्याचा गवाजावा करत आमदार राजेश विटेकर आणि माजी नगराध्यक्ष चंद्रकांत राठोड यांनी अनेक भुमीपुजने उरकली व त्या प्रभागातील मतदारांना मतदानासाठी प्रलोभन दाखवले . शहरातील देवी मंदीर येथे २९ ऑक्टोबर रोजी मतदार संघाचे आमदार राजेश विटेकर



व इतरांच्या उपस्थितीत सभामंडपाच्या कामाचे भव्य असे भुमीपुजन पार पडले नंतर झालेल्या नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला बहुमत मिळाले तरी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार पडल्याने स्थानिक राजकारण बदलुन गेले . या देवी मंदीर परिसरातील सभामंडपासाठी राज्य सरकारने २० ऑक्टोबर ला एका निर्णयाद्वारे एक कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. या निधीची निविदा प्रक्रिया अंतिम टप्यात असतांनाच राज्य सरकारने दि १३ मार्च रोजी एका शुध्दी पत्रकाद्वारे सोनपेठ शहरातील देवी मंदीर परिसरातील सभामंडपासाठी चा निधी रद्द करुन तो निधी मानवत शहरातील नाल्यांच्या बांधकामासाठी वळविल्याने शहरातील भाविकांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. निवडणुकीत अपेक्षीत मतदान न मिळाल्याने निधी इतरत्र वळविण्यात मुळे भाविकांच्या श्रध्देशी तर खेळ झालाच पण मंदीराच्या सभामंडपाचा निधी जाणीवपूर्वक नाल्यांसाठी वापरुन भाविकांच्या भावनाचा अपमान केल्याने या प्रक्रियेत सहभागी सर्वांना सुबुद्धी भेटो या साठी उद्या दि.३१ मार्च मंगळवार रोजी भाविक जगदंबा देवी मंदीरात आत्मक्लेश करणार आहेत व सभामंडपाचे बांधकाम भाविक लोक सहभागातून करतील असे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ईमेल व तहसीलदार यांच्या मार्फत देण्यात आले आहे. या निवेदनावर सुधीर बिंदू, कृष्णा पिंगळे व भाविकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# समाज माध्यमांमुळे महिलांची सुरक्षितता धोक्यात : डॉ. संगीता आवचार यांचा इशारा



## ऑनलाईन छळ, अफवा आणि गोपनीयतेचा भंग वाढल्याने चिंतेत वाढ

(गणेश सवणे/ दै.धर्मयोध्दा)

**सेलू -** समाज माध्यमांच्या वाढत्या वापरामुळे महिलांची सुरक्षितता तसेच समाज व्यवस्था धोक्यात येत असल्याचा गंभीर इशारा कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालयाच्या इंग्रजी विभाग प्रमुख तथा प्रसिद्ध कवयित्री, साहित्यिक डॉ. संगिता आवचार यांनी दि. २७ मार्च रोजी सेलू येथे दिला. नूतन विद्यालय शिक्षण संस्था, सेलू व महिला मंडळ, सेलू यांच्या संयुक्त विद्यमाने कै. श्रीरामजी भांगडीया शतकोत्तर रजतजयंती निमित्त आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या. ''समाज माध्यमांमुळे महिलांची सुरक्षितता आणि समाज व्यवस्था धोक्यात'' या विषयावर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. समाज माध्यमांचा अतिरेकी व अयोग्य वापर महिलांसाठी अनेक धोके निर्माण करीत असून, यासाठी सजगता आणि जबाबदारीची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नूतन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. सत्यनारायण लोया होते. व्यासपीठावर प्राचार्य विनायकराव कोठेकर, महिला मंडळाच्या अध्यक्षा विजया कोठेकर, सचिव ललीता गिल्डा, नूतन कन्या प्रशालेच्या मुख्याध्यापिका निशा पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य विनायकराव कोठेकर यांनी केले. महिला मंडळाच्या वतीने ललीता गिल्डा यांनी मनोगत व्यक्त करत कार्यक्रमाच्या उद्देशावर प्रकाश टाकला. सूत्रसंचालन हेमलता देशमुख यांनी केले, तर आभार निशा पाटील यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थिनी, महिला व नागरिकांची उपस्थिती लक्षणीय होती.

# बिबट्याच्या हल्ल्या पासून बचाव कसा करावा याबाबत नागरी निवारा संकल्प सहनिवास वसाहतीतील रहिवाश्यांना वनविभागातर्फे जनजागृती अभियानाद्वारे मार्गदर्शन

(दिनेश मराठे/ दै.धर्मयोध्दा)

**मुंबई -** परिसरात बिबट्यांचा वाढता वावर... प्राण्यावर करण्यात आलेले हल्ले. यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली भीती... याप्रश्नी रहिवाश्यांना दिलासा देण्यासाठी नागरी निवारा येथील संकल्प सहनिवास वसाहतीमधील राहिवाश्यांमध्ये जनजागृती करून त्यांच्या मनातील शंका दूर करून येथील वातावरण भयमुक्त करण्यासाठी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वनअधिकारी यांनी जनजागृती अभियानात केलेल्या मार्गदर्शनास रहिवाश्यांनी उत्तम प्रतिसाद दिला. वनअधिकारी यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे येथील वातावरण भयमुक्त होण्यास मदत झाली आहे. गेल्या काही दिवसात नागरी निवारा परिषद येथील संकल्प सहनिवास संकुल तसेच रहेजा हाईट्स सोसायटीत भक्ष्य शोधण्यासाठी बिबट्यांचा वावर



वाढल्याने या परिसरातील हजारो राहिवाश्यांमध्ये बिबट्याच्या दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. भीतीची बाब म्हणजे हे बिबटे सायंकाळी ७ वाजताच या परिसरात दिसून येत असल्याने संध्याकाळी ७ नंतर घरच्या बाहेर पडायचे कि नाही? असा प्रश्न येथील राहिवाश्यांना पडला होता. त्यामुळे यांचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी येथील रहिवाशांनी केली होती. स्थानिक खासदार व आमदार या दोन्ही लोकप्रतिनिधी यांनीही याची गंभीर दाखल घेत वनविभागाशी संपर्क साधत कुठलीही अप्रिय घटना घडण्यापूर्वी तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित अधिकारी याना दिल्या होत्या. वनअधिकारी यांनी देखिय तातडीने परिसराची पाहणी करून उपाययोजना करण्यास सुरुवात केली. रीह्वाश्यांसाठी जनजागृती अभियान ठेवण्याची सूचना हि त्यांनी केली होती. त्यानुसार या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानात वनअधिकारी हेमंत फणसे यांनी, बिबट्याच्या हल्ल्यापासून कुठली काळजी घ्यायची...बिबट्या समोर आला तर काय करावे व काय करून नये याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तर निखील बनगर यांनी बिबट्याची सायकोलॉजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तर निकेत शिंदे यांनी संकल्प सहनिवास परिसरात वनविभागातर्फे करण्यात आलेल्या उपाययोजना याबाबत उपस्थितांना माहिती दिली. तसेच ज्या परिसरात बिबट्याचा वावर वाढला आहे त्या ठिकाणीची स्वच्छता करण्यात यावी, जास्त लाईटची व्यवस्था करण्यात यावी, संरक्षण जाळ्यांची उंची वाढवण्यात यावी, अशा सूचना देण्यात आल्या. बिबट्याचा येण्याचा मार्ग व वेळ समजण्यासाठी या परिसरात विविध ठिकाणी सीसी कॅमेरे लावण्यात आले असून, या उपाययोजना करूनही बिबट्याचा वावर कमी झाला नाही तर वनविभागाच्या नियमानुसार बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावण्यात येईल, असे शिंदे यांनी सांगितले. मुंबई महानगरपालिकेच्या पी दक्षिण विभागातील आरोग्य खात्यातील डॉ.यादव यांनी, भटकी कुत्री, मांजर याबाबत महानगरपालिकेची जबाबदारी याबाबतची सविस्तर माहिती दिली. या जनजागृती अभियानात वनअधिकारी निकेत शिंदे, निखील बनगर, हेमंत फणसे, मुंबई महानगरपालिकेच्या पी दक्षिण विभागातील आरोग्य खात्याचे डॉ. यादव यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आयोजन संकल्प सहनिवास फ ेडरल सोसायटीचे अध्यक्ष अरुण साटम, सचिव हनुमंत सुळे, सुबोध महाडिक, यांनी केले होते. यात सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष धनंजय पाणबुडे, महासंघाचे पदाधीकारी संग्राम राणे स्थानिक रहिवाशी उपस्थित होते. रहिवाश्यांनी उपस्थित राहून आपल्या शंकांचे निरसन केले.

# बाल विद्यामंदिरच्या आदित्य पांचाळ ला राज्यस्तरीय शालेय रोप स्किपिंग स्पर्धेत दोन गोल्ड एक सिल्वर मेडल



**परभणी-** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर यांच्या वतीने शालेय राज्यस्तरीय रोप स्किपिंग स्पर्धा घेण्यात आल्या. सदरील स्पर्धेत बाल विद्या मंदिरच्या आदित्य लक्ष्मण पांचाळ या खेळाडूने रोप स्किपिंग स्पर्धेत अतिशय उत्कृष्ट कामगिरी करत डबल अंडर व थर्टी सेकंड स्पीड या दोन प्रकारात गोल्ड मेडल व इंडोरन्स या प्रकारात एक सिल्वर मेडल मिळवळे आहे. विजयी संघातील खेळाडूंचे व क्रीडाशिक्षक श्री ज्ञानेश्वर पंडित, श्री संतोष देशमुख, श्री प्रभाकर गमे, यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष डॉ.श्री नंदकुमार झरकर, सचिव डॉ.श्री विवेक नावंदर व सर्व संचालक मंडळ तसेच प्रशालेचे मुख्याध्यापक श्री अरुण बोराडे उपमुख्याध्यापक श्री रामदास तुम्मेवार पर्यवेक्षक श्री प्रदीप रुघे , श्री बळीराम कोपरटकर सौ सीमा बोके यांनी केले व राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक–शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao